महानमानव

# स्वराज्य मंत्रकर्ते लोकमान्य टिळक

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ला. वा.
दा. क्र. 388



BVBK-0400388

स्वराज्य मंत्रकर्ते

# लोकमान्य टिळक


लेखक

मो. मा. वाळिंबे



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

बाल वाङ्मय विभाग.

दा. क्र. 388 दिनांक .......

विषय ...बा. वा.... क्र. ..........

BV BK-0400388


किंमत एक रुपया

# मनोगत

या पुस्तकाच्या पुढल्या काही पानांतून मी स्वराज्य मंत्रकर्ते लोकमान्य टिळकांचे चरित्र वर्णिले आहे 'वर्णिले आहे,' असे मी हेतुपुरस्पर म्हणतो आहे कारण त्यांची भाषा आणि मांडणी केवळ माझी आहे. बाकी प्रत्यक्ष जीवनधन जो महापुरुष हे दिव्यदाहक जीवन जगला त्याचे आहे.

हे चरित्रे लिहिण्याच्या कामी मला श्री. दा. न. शिखरे, यांनी लिहिलेल्या लोकमान्य टिळक व महाराष्ट्राचा महापुरुष, या पुस्तकाचा अत्यंत बहुमोल असा उपयोग झाला. अर्थातच त्यासाठी लेखकाचा मी सदैव ऋणी आहे.

कोणत्याही देशाच्या घडणीत तिथल्या लहान मुलांचा महत्वाचा भाग असतो आणि त्या लहान मुलाच्या घडणीसाठी त्याच्यासमोर अनेक कर्तृत्ववान बुद्धिमान, उद्यमशील व देशभक्त अशा महापुरुषांचा आदर्श ठेवणे अगत्याचे असते, त्या दृष्टीने अरगडे कुलकर्णी प्रकाशन, पुणे, या प्रकाशसंस्थेने आदर्श पुरुषांच्या चरित्रात्मक पुस्तकांची एक दीपमाळच उभारायचे ठरविले. मलाही त्यांनी दोन चरित्रपुस्तके लिहायला सांगून आपल्या या दीपोत्सवात सहभागी होण्याची संधी दिली, याबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

या पुस्तकाच्या रूपाने आपला जीवनमार्ग सदैव प्रकाशमान करण्यासाठी मी एक चरित्रदीप लावतो आहे. त्यात लोकमान्य टिळक, यांच्या पराक्रमी व मार्गदर्शक जीवनाची गाथा मी गायली आहे. माझी एवढीच इच्छा आहे, की तुम्ही बालगोपालांनी ही चरित्रे वाचून त्यापासून काही गुण घ्यावे व आपल्या देशाची मान जगात उंचावेल असे काही कर्तृत्व गाजवावे !

मोरेश्वर वाळिंबे

आषाढ शुद्ध प्रतिपदा
शके १८९१.

प्रकाशकीय–

किशोरांसाठी विविध मनोरंजक उद्‌बोधक पुस्तके प्रकाशित करण्याचा संकल्प आहे. आजपर्यंत प्रकाशित झालेली पुस्तके किशोरांना फारच आवडली.

"स्वराज्य मंत्रकर्ते लोकमान्य टिळक" हे असेच उद्‌बोधक आणि संस्कार-क्षमपुस्तक किशोर मित्रांना खासच आवडेल. संस्कारक्षम बालमनावर मनोरंजनाद्वारे संस्कार म्हणजेच उत्तम पुस्तके. त्यासाठीच प्रत्येकाने आमची प्रकाशनें संग्रही ठेवावीत.


प्रकाशिका :
सौ. निर्मला नारायण अरगडे
सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन
१६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

चित्रकार : र. स. कंटक

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट १९६९
पुर्नमुद्रण जून १९७८

मुद्रक
श्री. प्रभाकर सरदेसाई
अक्षर मुद्रणालय
६० ब्रऱ्हाणपुर बलवण, लोणावळा


( सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन )


: प्राप्तीस्थान :

अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ३०

श्री. माधव कुलकर्णी
२४३ बद्रिकाश्रम,
१ली खेतवाडी, गिरगाव, मुंबई–४



# १. स्वराज्य मंत्रकर्ते लोकमान्य टिळक

रत्नागिरी जिल्ह्यात चिखलगाव नावाचे एक खेडेगाव आहे. गाव अगदी लहानसे. शे-सव्वाशे उंबरठ्याचे. गावातली माणसे गरीब; पण तिथला निसर्ग मोठा श्रीमंत. केळी, कर्दळी, नारळी, पोफळी, आंबे, काजू अशा असंख्य वृक्षांनी जागोजाग चवऱ्या उभारलेल्या. भणाणता रानवारा, प्रसन्नपणे शीळ घालीत अष्टौप्रहर इथून तिथून भटकायचा. त्याच्या जोडीला खेळायला यायच्या खिदळत्या समुद्राच्या लाटा. गावाभोवती डोंगराच्या रांगा आणि माथ्यावर नीलधवल आकाशाचा मांडव. अंगडेटोपडे लेवून अन काजळ-तीट रेखून रांगणाऱ्या एखाद्या गोंडस देखण्या बाळासारखे ते गाव फार मोहक वाटायचे.

अशा या गावात १८५६ सालच्या २३ जुलैला लो. टिळक जन्माला आले. जन्म झाला त्यावेळी ते लोकमान्य नव्हते. नुसते न बाळ होते. त्या बाळाचेच पुढे लोकामान्य बाळ गंगाधर टिळक झाले 'लोकामान्य टिळक' या नावाने इंग्रजांचे सिंहासन हादरवले, तर त्याच शब्दांनी भारतीयांच्या स्वातंत्र्यांचे सिंहासन उभारले गेले. लोकमान्य टिळक हे दोन शब्द उच्चारताच इंग्रजांच्या छातीत धडकी भरत असे, उलट भारतीयांचे ऊर अभिमानाने भरून येत असे-मान आदराने लवत असे.

उण्या पुऱ्या एकशे बारा-चौदा वर्षांपूर्वी कोकणच्या कुशीत जन्माला आलेल्या एका लहानशा बाळाने ब्रिटिश साम्राज्यशाहीचे सिंहासन गदगदा हालविण्याचा जो भीमपराक्रम केला, तो जितका रोमांचकारी तितकाच उद्बोधक.

टिळकांच्या वडिलांचे नाव गंगाधरपंत आणि आईचे नाव पार्वतीबाई. हे पार्वती गंगाधर जोडपे रत्नागिरीत राहायचे. हसत मुखी आणि सदा सुखी. घरी श्रीमंती नव्हती, पण उदार आणि

दिलदार अशी संतोषी, समाधानी वृत्ती होती. गंगाधरपंत शिक्षक होते. प्रतिदिवशी प्रसन्न मनाने उठायचे, दोघानी मिळून भूपाळ्या आणि देवतांची स्तोत्रे म्हणत प्रातर्विधी उरकायचे आणि दिवसाच्या आत कामांना प्रारंभ करायचा. लवमात्र आळसात वेळ दवडायचा नाही. सारखे उद्योगात रमायचे. अडल्या पडल्यांना मदत करायची. दारी आलेला अतिथी उपाशी जाऊ द्यायचा नाही. असा सगळा समाधानी आणि सुखी संसार होता त्या दापंत्याचा. पण तरीही त्यांच्या संसारात एक न्यून होते, एक दुःख होते. या दापंत्याला मुलगा नव्हता. पार्वतीबाईंनी त्यासाठी खूप उपवास केले, व्रत -वैकल्ये केली. दान-धर्मही केला, अखेर कुणी तरी सुचविले–'तुम्ही सूर्योपासना करा.' पार्वतीबाई म्हणाल्या. 'अवश्य करीन.'

–आणि पार्वतीबाईंनी खरोखरीच सूर्योपासना आरंभली. सूर्याचे व्रत म्हणजे महाखडतर. पण पार्वतीबाईनी ते ज्या जिद्दीने आरंभले त्याच जिद्दीने पुरतेही केले. त्यापायी त्यांची आधीच कृश असलेली काया आणखीणच कृश झाली. पण त्यांचे हृदय वज्र निश्चयी होते. त्या वज्रनिश्चयामुळे त्यांची सूर्योपासना फलप्रद ठरली आणि साक्षात सूर्यासारखा तेजस्वी मुलगा त्यांच्या उदरी जन्मला. पार्वतीबाईनी त्याचे नाव केशव ठेवले. संध्येचे आरंभी आपण पहिला अर्घ्य देतो, 'केशवाय नमः' हा भारतीय स्वातंत्र्याच्या नेत्यांची नामावली घ्यायची झाली तर ? 'केशवाय नमः म्हटले तरी चालेल म्हणा ! पण टिळकांनी केशव असे नाव लावलेच नाही आयुष्यभर आणि नंतरही त्यांचा जयजयकार होत राहिला, तो मात्र 'बाळ गंगाधर टिळक' अशा मंत्ररूप शद्बांनी

सूर्योपासना झालेला मुलगा नुसताच तेजस्वी झाला नाही, तर तो आपल्या वडिलांसारखा विद्वानही झाला अन आईसारखा तपस्वीही झाला. आठव्या वर्षी त्याची मुंज झाली; पण त्यापूर्वीच त्याने अमरकोश, समासचक्र, रूपावली यासारखा संस्कृताचा

अभ्यास आणि अंकगणित, बीजगणित, भूमिती या विषयाची प्राथमिक तयारी पुरी केली होती. दहाव्या वर्षी तर तो संस्कृत श्लोकांचा अर्थही लावू लागला. अभ्यासात अशी प्रगतीची घोड-दौड चालू असतानाच बाळाच्या माथ्यावरचे मातेचे कृपाछत्र ईश्वराने हिरावून नेले. इ. स. १८६६ साली पार्वतीबाई एकाएकीच कैलासवासी झाल्या. अनपेक्षित आलेल्या या मृत्युच्या वादळ-वाऱ्याने बाळ एखाद्या केळी-कर्दळीसारखा मुळापासून थरकला; पण अखेरी तो निर्धारी अन करारी मातेचा पुत्र होता. विद्येवरचे आपले लक्ष लवमात्र कमी न करता तो शिकत राहिला.

इ. स. १८३९ साली बाळ पुण्यात आला. तिथल्या इंग्रजी शाळेत शिकू लागला. दोनच वर्षांनी 'बाळ' आडनावाच्या कुटुंबा-तील तापी नावाच्या एका मुलीशी त्यांचे लग्नही झाले. पुढच्या वर्षी तो उत्तम गुण मिळवूण मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. एका पाठोपाठ चढत्या क्रमाने घडत जाणाऱ्या या सुखद घटनांनी बाळाचा उत्साह वाढत चालला होता. आता आपण महाविद्यालयात जायचे आणि उच्च शिक्षण मिळवून पदवीधर व्हायचे असे मनो-रथ तो करू लागला? पण एवढ्यात पुन्हा त्याचे दुर्दैव त्याच्यापुढे दत्त म्हणून उभे राहिले. १८७२ साली त्याच्या वडिलांचा मृत्यू झाला. आई गेली आणि वडिलही गेले; पण त्यांनी आपल्या बाळासाठी मागे काय ठेवले? आईने त्याला सूर्याचे तेज दिले होते आणि वडिलांनी त्याला विद्या–धन दिले होते. त्याने खूप खूप शिकावे, प्रकांड पंडित व्हावे, अशी त्याच्या वडिलांची आकांक्षा होती व म्हणूनच त्यांनी पै पै साठवून सुमारे पाच सहस्त्र रुपये त्याच्या शिक्षणार्थ बाजूला ठेवले होते. ते धन आणि आईवडिलांच्या आकांक्षा यांच्या बळावरच त्याची पुढची वाटचाल यशस्वी होणार होती. मॅट्रिक परीक्षा झाली, आता तो उच्च शिक्षणाच्या दिग्विजयार्थ सिद्ध झाला होता.

उच्च शिक्षणासाठी बाळाने पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात पदार्पण केले. मित्रमंडळात आणि आप्तस्वजनात बाळाला आता बळवंतराव या आदरार्थी नावाने संबोधू लागले. बळवंतरावांचे हे नवे महाविद्यालय खास करून श्रीमंत विद्यार्थ्यांसाठी होते. या श्रीमंत विद्यार्थ्यांना अधिक आवड होती, ती विद्याध्ययनाची नव्हे तर विलासी आणि छानछोकी जीवन जगण्याची ! उत्तमोत्तम कपडे ल्यावे, नाना चवीचे स्वादिष्ट पदार्थ खावे, हसावे, खेळावे, व्यसने करावी आणि मग जमल्यास जाता जाता चार परीक्षा देऊन पदव्या मिळवाव्या, यासाठीच ते तिथे येत.

बळवंतराव मात्र यापेक्षा एक वेगळाच अन उदात्त उद्देश मनात बाळगून तिथे आले होते. शक्यतो थोडक्या खर्चात परतु नेमके आणि नेटके शिक्षण घ्यावे व त्या घेतलेल्या शिक्षणाच्या बळावर आपल्या देशबांधवांना शहाणे व सुखी करावे, पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करावे, त्यासाठी शाळा चालवाव्या, वृत्तपत्रे काढावी, व्याख्याने द्यावी असे त्यांचे स्वप्न होते.

या स्वप्नाच्या पूर्तीसाठी त्यांनी प्रथम स्वतःचे शरीर बळकट करायचे ठरविले व ते व्यायाम शाळेत जाऊन जोर–बैठका काढू लागले, मल्लखांब खेळू लागले, थोड्याच दिवसात त्यांचे शरीर पोलादाच्या कांबीसारखे टणक झाले. महाविद्यालयाच्या परीक्षेत पहिल्याच वर्षी त्यांना अपयश आले; पण न डरता त्यांनी पुन्हा अभ्यासावर जोर दिला व यश हस्तगत केले.

प्रारंभापासूनच बळवंतरावांचा स्वभाव मोठा चौकस अन् जिज्ञासू. सगळ्या विषयात त्यांना कुतूहल. सारे आपल्याला आले पाहिजे अन् सारे आपल्याला समजले पाहिजे अशी त्यांची वृत्ती. त्यामुळे ते अभ्यासाची पुस्तके तर वाचीत पण त्याशिवाय आणखी-ही निरनिराळ्या विषयावरचे लहान मोठे ग्रंथ वाचून काढीत

व त्याची टिपणे ठेवीत. वर्तमापत्रे तर ते अतिशय बारकाईने वाचीत. त्यामुळे देशात कुठे काय चालले आहे याची त्यांना अचूक माहिती मिळे.

इ. स. १८७५ साली बळवंतरावांना एक मित्र भेटला. तोही त्यांच्यासारखाच देशोद्धाराच्या विचारांनी वेडा झालेला आणि अत्यंत हुशार असा होता. त्याचे नाव गोपाळ गणेश आगरकर. बळवंतरावांची आणि त्यांची अवघ्या दिड दोन महिन्यात अगदी गट्टी जमली. राहणे, जेवणे, बसणे, उठणे, फिरायला जाणे, अभ्यास करणे, चर्चा करणे, एवढेच काय भांडणेसुद्धा ते बरोबरीने करू लागले. सगळ्या महाविद्यालयात त्यांची जोडी 'बाळ गोपाळ' या एकाच नावानेओळखली जाऊ लागली.

इ. स. १८७३ साली बळवंतराव बी. ए. ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. पुढील वर्षी त्यांनी एम. ए. ची परीक्षा दिली परंतु लागोपाठ दोन वर्षे त्यांना अपयश आले. मग त्यांनी तो नाद सोडून इ. स. १८७९ मध्ये एलएल. बी. ची परीक्षा दिली आणि त्यात ते उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले.

या परीक्षा देत असतानाच ही बाळ गोपाळांची जोडी आपले भावी ध्येयमंदिर उभारीत होती. आपल्या निबंधमालेच्या द्वारे नानाविध विषयांचे सांगोपांग विवेचन करणारे आणि महाराष्ट्रीयांचा देशाभिमान चेतावणारे असे विष्णुशास्त्री चिपळूणकर त्यांचे मार्गदर्शक गुरू झाले होते. त्यांच्या उत्तेजनाने आणि आशीर्वादाने टिळक-आगरकरांनी एका एका महान कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

पारतंत्र्याच्या घोर अंधःकारात चाचपडणाऱ्या आणि स्वत्व विसरून मेल्या मनाने जगणाऱ्या कोटयावधी देशबांधवांना खडबडून जागे करायचे, तर त्यासाठी अगदी पहिला अन् रामबाण असा उपाय म्हणजे शिक्षण! लोकांना शिकवायचे म्हणजे शाळा काढायच्या आणि सबंध देशात व कुठे काय चालले आहे, हे त्यांना

समजावून सांगायचे म्हणजे वृत्तपत्रे चालू करायची असे दोन मार्ग चिपळूणकर, टिळक आणि आगरकर यांना सुचले.

त्याचप्रमाणे १ जाने. १८८० या दिवशी पुण्यातील मोरोबादादाच्या वाड्यात न्यू इंग्लिश स्कूल नामक एका नव्या शाळेची स्थापना झाली. पहिल्या दिवशी सबंध शाळेत मुले होती अवघी एकोणीस; पण दुसऱ्या दिवसापासूनच मुंग्यांची रीघ लागावी, तसे विद्यार्थी लोटू लागले तिथल्या शिक्षकांना पगार, प्रतिमासी तीस रुपये. सगळे पदवीधर शिक्षक. सरकारी नोकरीत गेले असते, तर शेकडो रुपये कमावले असते एकेकानी. पण पैसा मिळवणे आणि सुखाचे आयुष्य जगणे हे मुळी त्यांचे ध्येयच नव्हते.

शाळा सुरू झाली, मुलांनीही दाटीवाटीने तिथें गर्दी केली पण एवढ्याने शाळेचे यश निश्चित झाले थोडेच! शाळा यशस्वी झाली असे तेव्हाच म्हणायचे, की जेव्हा तिथल्या विद्यार्थ्यांना धो धो मार्क्स पडतात आणि सगळेच्या सगळे विद्यार्थी जेव्हा एकसाथ परीक्षा उत्तीर्ण होतात न्यू इंग्लिश स्कूलने याही बाबतीत नेत्रदीपक कामगिरी केली. शाळेतले शिकवणे आणि विद्यार्थ्यांचे परीक्षेतले यश पाहून प्रो. वर्डस्वर्थ, डॉ. भांडारकर, मुंबईचे गव्हर्नर अशा नामवंतांनी शाळेच्या चालकांचे मनसोक्त कौतुक केले आणि त्यांना धन्यवाद दिले.

शाळेचा असा गौरव झाला व आपल्या श्रमाचे सार्थक झालेले पाहून चिपळूणकर, टिळक, आगरकर या त्रिमूर्तींना आणखी उत्साह आला आणि त्यांनी पुढच्याच वर्षी म्हणजे १८८१ साली केसरी नामक एक वृत्तपत्र सुरू केले. त्याच्या जोडीला मराठा नावाचे इंग्रजी पत्रही काढण्यात आले. टिळक आगरकरांचा उत्साह इतका उदंड, की पहिल्या काही दिवसात त्यांनी स्वतः घरोघर जाऊन अंक वाटले. इतकेच काय, पण टाइपांच्या पेट्याही खांद्यावरून वाहिल्या!

त्या काळी वर्तमानपत्र काढणे हे एक दिव्य, ते चालवणे व टिकवणे हे आणखी दिव्य आणि त्यात देशबांधवांची बाजू घेऊन लिहिणे हे तर फारच मोठे दिव्य! नुसतेच दिव्य नव्हे तर दाहकसुद्धा! टिळक आगरकरांना लौकरच त्याची प्रचीती आली.

निमित्त झाले लहानसे. कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी महाराज यांचा तिथल्या दिवाणाने- रा. ब. बर्वे यांनी छळ आरंभला. दिवाणाला पाठिंबा होता, इंग्रज अधिकाऱ्यांचा. कुठेही अन्याय झाला, की त्याला वाचा फोडण्याचे काम वर्तमानपत्राचे. त्यामुळे कोल्हापूरच्या काही माणसांनी छत्रपतींच्या छळाच्या वार्ता केसरी मराठ्याला कळविल्या. टिळक-आगरकरांनी त्या तशाच छापल्या अन्. मग काय ? बर्वे यांनी आपल्या वरील अरोप सिद्ध करण्याचे टिळक-आगरकरांना आव्हान दिले. न्यायालयात खटला उभा राहिला पण कोल्हापूरच्या ज्या माणसांनी अगोदर छत्रपतींच्या छळाच्या वार्ता केसरी मराठ्याला कळविल्या होत्या, त्यानी न्यायालयात काही तोंड उघडले नाही. परिणामी टिळक आगरकर तिथे खोटे ठरले आणि त्यांना दि. १७ जुलै १८८२ रोजी चार महिने साध्या बंदिवासाची शिक्षा झाली.

ही शिक्षा त्यांनी मुंबईजवळच्या डोंगरीच्या कारागृहात भोगली. तेरा फुटांची चौकोनी कोठडी. आत ढेकूण, पिसवा, सुरवंट, डास इ. उपद्रवी प्राण्यांची वस्ती. खायला कांदा भाकर आणि निजायला घोंगडी. लघवी, शौच्याची कुंडीही त्याच कोठडीत. पण टिळक आगरकरांनी हा सारा वनवास निग्रहाने आणि देशोद्धाराच्या चर्चा करीत सहन केला. या काळात टिळकाचे वजन २४ पौंडांनी आणि आगरकरांचे १६ पौंडांनी कमी झाले. १०१ दिवस बंदिवास भोगल्यावर दोघे मित्र दि. २६ ऑक्टोबर १८८२ या दिवशी मुक्त झाले. तुरुंगाबाहेर येताच तो सहस्त्रो लोकांनी स्वागतासाठी गर्दी केलेली. हार-तुरे काय, पानसुपाऱ्या काय सत्कार सभा काय.

एकच जल्लोश उडून गेला. टिळक आगरकरांनी आपल्या देशबांधवासाठी जे अमाप कष्ट सोसले होते त्याचे असे सार्थक होत होते दोघांची उमेद आता वाढली होती. नवे संकल्प, नव्या योजना नवी कार्ये डोळ्यासमोर उभी राहात होती. पण त्याच वेळी या दोन मित्रांत मतभेदाची आणि वितंडवादाची वादळेही उठू लागली होती. दिवसेदिवस वादाचे पर्यवसान वैरात होऊ पहात होते. परस्परविषयी कटू भावना मनात उद्‌भवत होत्या आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे टिळक-आगरकरांची समजूत काढून त्यांना एकत्र कामात गुंतवून ठेवणारा असा विष्णूशास्त्री चिपळूणकरांसारखा गुरुही आता अस्तगत झाला होता.

टिळक आणि आगरकर यांच्या मनोभूमिकेत मूलतःच अंतर होते. दोघांना आपल्या देशबांधवाची उन्नती व्हावी असे वाटत होते हे खरे, तथापि दोघांचे मार्ग पूर्णपणे भिन्न होते. भारतीय समाजात आणि विशेषतः हिंदू धर्मात जातिभेद अस्पृश्यता बाल-विवाह, विधवाची दुःस्थिती असे एकापेक्षा एक दुर्धर प्रकार रूढ होते त्यात सुधारणा व्हावी असे आगरकरांचे मत मग त्या कामी इंग्रज सरकारने कायदे केले तरी हरकत नाही, असे त्यांना वाटे देशातील सर्व लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. कोणी कोणाला दूर लोटत नाही. सर्वांना समान हक्क आणि शीक्षण यांचा लाभ होत आहे, स्त्रियांनाही शिक्षण मिळत आहे, बालविवाह होत नाहीत विधवांचे केशवपन होत नाही व त्यांना पुन्हा लग्न करून संसार करता येत आहे. अशी सगळी सुखी समाजाची चित्रे आगरकरांना नेहमी दिसत

टिळकांना या गोष्टी नको होत्या असे नाही, पण त्यांचे म्हणणे त्यासाठी इंग्रज सरकारची ढवळाढवळ कशाला? आम्ही प्रथम इंग्रजांना इथून घालवून देऊ' आमचा देश स्वतंत्र करू व मग आमच्या देशबांधवांचे काय दोष असतील ते दूर करू. पण त्या-

साठी आधी राजकीय स्वातंत्र्य मिळवू! सर्व प्रकारे आपण शहाणे सुबुद्ध, कर्तबगार झालो. आपण देशात सर्वत्र समानता प्रस्थापित केली, की इंग्रज आपोआप हा देश सोडून जातील. तात्पर्य आधी राजकीय की आधी सामाजिक, हा वादाचा मुद्दा ठरला आणि त्यावरून अक्षरशः रणे माजली!

या मुख्य वादाला जेव्हा वैराचे आणि द्वेषाचे स्वरूप आले, तेव्हा टिळक आणि आगरकर एकामेकाची उणीदुणी शोधू लागले व त्यावरून भांडू लागले.

न्यू इंग्लीश स्कूल चालू होऊन आता ४–५ वर्षे झाली होती. या शाळेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एखादे महाविद्यालय असावे , म्हणून दि २ जानेवारी १८८५ साली फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना झाली. तिथेही टिळक आगरकर आणि त्यांचे अन्य सहकारी शिकवू लागले, पण पुढे पुढे आणखी शिक्षक प्राध्यापक आले. ते सारेच काही ध्येयवादाने भारलेले आणि स्वार्थत्यागाने रंगलेले नव्हते. थोड्याच दिवसात ते अधिकाधिक वेतन मागू लागले. पैशासाठी अन्य उद्योग करू लागले. कुणी गणिताची पुस्तके लिहिली तर कुणी शास्त्राची एकूण सगळा मामला स्वार्थीपणाचा. टिळकांना हे कधीच मानवणारे नव्हते. पण आगरकर जेव्हा या नव्या प्राध्यापक शिक्षकांची बाजू घेऊ लागले, तेव्हा त्यांना आगरकरांचा राग आला व असल्या स्वार्थी, ध्येयशून्य मंडळीच्याबरोबर काम करण्याची किळस आली. त्यांनी इ. स. १८८९ साली महाविद्यालयातून काढता पाय घेतला. उलट टिळकांशी संबंध नको म्हणून आगरकर केसरीतून बाहेर पडले.

शाळा आणि महाविद्यालयाच्या व्यापातून मुक्त होताच टिळकांनी समाजाची सर्वांगाने सेवा आरंभली. इ. स. १८९५ साली पुण्याच्या नगरपालिकेत ते निवडून गेले. त्याच वर्षी मुंबईच्या विधिमंडळातही त्यांची निवड झाली. लोकांच्या हक्कासाठी जिथे

जिथे शांतता येईल, ती सारी क्षेत्रे पादाक्रांत करण्याचा त्यांनी जणू विडाच उचलला.

केसरीचे संपादक म्हणून, पुणे नगरपालिका आणि मुंबई विधीमंडळाचे सदस्य या नात्याने, मुंबई विद्यापीठाचे फेलो म्हणून अखिल भारतीय काँग्रेसचे चिटणीस म्हणून- एक ना दोन-नाना जागावरून काम करीत त्यांनी आपली लोकसेवा चालू ठेवली. प्रत्येक क्षेत्रात कोणत्याही कामाला हलके न मानता काम करायचे हा त्यांचा बाणा त्यामुळे काँग्रेसचे चिटणीस असूनही वर्गणी जमविण्यासाठी ते लोकांच्या दारोदार हिंडले!

परकीय सरकारशी किंवा शत्रूशी लढायचे म्हणजे आपसात एकी हवी. टिळकांना प्रारंभापासून एका गोष्टीची खंत वाटे, की या तीसचाळीस कोटी भारतीय लोकांच्यात एकी नाही. संघटन नाही. परस्परांविषयी विश्वास नाही, सदभावना नाही. परकीय राजकर्त्यांनी तर 'फोडा आणि झोडा' या वृतीनेच वागण्याची प्रतिज्ञा केलेली. त्यांच्या दृष्टीने ते फायद्याचेच होते पण स्वातंत्र्या साठी लढायला सिद्ध झालेल्या लोकांच्यात शिस्त आणि संघटना या दोन गोष्टी आवश्य होत्या टिळकांचे सारे प्रयत्न लोकांनी संघटित व्हावे व शत्रूविरुद्ध स्वाभिमानाने उभे राहावे यासाठी होते, पण भारतीय लोकांत हिंदू व मुसलमान अशा उभय धर्माचे लोक होते. हिंदुबरोबर सुखाने वागायला मुसलमान तयार नव्हते. इंग्रजांनी त्याना तसेच फुटून वागायला प्रोत्साहन दिले. हिन्दूच्या धार्मिक भावनांवर आघात करायला शिकवले. मुसलमानांच्यात ही वृती प्रारंभापासूनच होती, आता तिला राज्यकर्त्या इंग्रजांचे पाठबळ मिळाल्यामुळे मुसलमान भलतेच शेफारलें त्यांनी देशभर दंगे करायला सुरुवात केली. कुठे गायव काप, कुठे हिन्दूच्या देवावर किंवा देवळावर हत्यारच चालव, तर कुठे एखाद्या हिन्दू स्त्रीवर अत्याचार कर, असे प्रकार सुरू झाले

टिळकांनी हिन्दू-मुसलमानात सलोखा व्हावा म्हणून खूप प्रयत्न केले. पण शेवटी त्यांच्या लक्षात आले, की या मुजोर मुसलमानांना वठणीवर आणण्यासाठी हिन्दूनाही प्रतिकाराला सिद्ध केले पाहिजे, कणखर व साहसी बनविले पाहिजे.

मग त्यांनी दोन उत्सव आरंभले. एक विघ्नहर्त्या गणेशाचा आणि दुसरा स्वातंत्र्यदात्या शिवाजीचा. टिळकांचा हा उपाय इतका रामबाण ठरला, की या दोन उत्सवांच्या निमित्ताने निघणाऱ्या मिरवणुकांतून, होणाऱ्या व्याख्यानांतून व मेळ्यांतून लक्षावधी हिंदूच्यात अभूतपूर्व जागृती झाली. त्या जागृतीमुळे मुसलमानांनी तर धसका घेतलाच,पण इंग्रज सरकारही हादरून गेले. हिंदुस्थानातील क्रांतिकारक आंदोलनांचा उगम या उत्सवातहोता, असे स्पष्ट निदान चिरोलसाहेबाने केले.

दि. १५ एप्रिल १८९६ या दिवशी रायडावर शिवछत्रतींचा उत्सव साजरा झाला. त्यामुळे लोकांच्या मनीमुखी शिवरायांचा जयघोष गर्जू लागला. इकडे लोकात जागृती होऊ लागली, तर तिकडे दुसऱ्याच दोन आपत्ती पुढे येऊन उभ्या राहिल्या. लोकांची प्रतिकारशक्ती किती वाढली, त्यांचे सामर्थ्य किती वाढले, हे पाहण्याची एक कसोटी म्हणूनच या आपत्ती महाराष्ट्रावर कोसळल्या असाव्या !

पहिली आपत्ती दुष्काळाची. सबंध वर्षात एक थेंबही पाऊस पडला नाही. लोकांची अन्नान्नदशा झाली. गुरे चारा–पाण्याविना पटापट मरू लागली. पण या कठीण वेळी सरकार काय करीत होते ? त्याने जनतेला दिलासा दिला का ? स्वस्त धान्याची दुकाने काढली का ? दुष्काळावर कायमची उपाययोजना म्हणून धरणे बांधली का ? कालवे बांधलें का? करसुलीत सूट दिली का ? दुष्काळी कामे काढली का? – नाव नको ! बोलून–चालून ते परके सरकार! लुटणे आणि पिळणे हा त्याचा धंदा! त्याला प्रजा मेली

काय अन् जगली काय?

टिळकांना सरकारच्या या निष्क्रीय वृत्तीचा संताप आला. त्यांनी लेखणी–वाणीची शस्त्रे अशी काहीं शौर्याने चालवली, की जग जिंकायला निघालेले ते परकीय इंग्रजही टिळकांच्या या मान्यापुढे हतबल झाले!

दुसरे संकट ग्रंथीज्वराचे. ग्रथीज्वर म्हणजे प्लेग. काखेत गाठ यायची, अंगात ताप भरायचा, दोन दिवस तळमतळायचे, की फटक्यात मरण! पुण्यात तर या ग्रंथीज्वराने असे थैमान घातले, की लोक अगदी हैराण झाले. रोजी १००–१२५ माणसे ओंकारेश्वरावर जाऊ लागली. खुद्द टिळकांचा मुलगा या तापाने मरण पावला. टिळक तेव्हा केसरीचा अग्रलेख लिहीत. मुलाच्या मृत्यूची वार्ता ऐकून तें सुन्न झाले, पण क्षणकालच! सबंध शहरात घरोघर मृत्यूचेच तांडवनृत्य चालू होते. लोकांना दिलासा द्यायला हवा होता. स्वतःच्या घरच्या दुःखासाठी रडत बसणे त्यांना शोभले नसते. ते दुःख गिळून केसरीचा अग्रलेख संपल्यावरच उठले.

टिळकांनी ग्रंथीज्वराच्या या साथीत लोकांना मदत करण्यासाठी स्वयंसेवकपथक उभारले. मोफत औषधयोजना सुरू केली. दुःखितांचे अश्रू पुसले अन् मग सरकारनेही काही करावे, यासाठी त्यांनी केसरीतून सरकारची हजेरी घ्यायला आरंभ केला.

अखेर सरकार जागे झाले, पण त्याने रोगनिवारणाचे जे उपाय योजले ते अगदी महाभयंकर! त्यामुळे रोग परवडला, पण सरकारी उपाय नको, अशी लोकांची स्थिती झाली, सरकारने रोगप्रतिबंधासाठी व शहरस्वच्छतेसाठी ब्रिटिश सोजिरांचे एक पथक आणले. हे सोजीर वाटेल तेव्हा, वाटेल त्याच्या घरात घुसत. स्त्रिया काय मुले काय, देव काय, म्हतारेकोतारे काय, सगळ्यांना लाथेने तुडवीत, तरण्याताठ्या पोरींचे हात धरीत, त्यांची अब्रू घेत, आजाऱ्यांना फरफटत बाहेर ओढत–एकसारखा असा धिंगाणा

सुरू झाला. लोक अगदी भयभीत होऊन गेले. काही थोडे लोक संतापाने बेभान झाले. सोजिरांच्या नरडीचा घोट घेण्याचा विचार त्यांच्या मनी घोळू लागला !

चाफेकर बंधू हे या अशाच संतप्त तरुणांपैकी. दामोदर, बाळकृष्ण, वासुदेव ही त्यांची नावे. सगळे भर तारुण्यातले. अठरापासून अठ्ठावीसपर्यंतच्या वयाचे. शरीराने बळदंड, विचाराने जहाल आणि टिळकांचे, तसेच देशाचे भक्त. त्यांनी सोजीरांचा प्रमुख रँड याचा वध करायचा निश्चय केला व तत्काळ तो अमलात आणला. दि २२ जून १८९७ रोजी गणेशखिंडीच्या रस्त्यावर चाफेकर बंधूंनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रँड व आयर्स्ट या दोन युरोपियनांचा वध केला. या वधांचा परिणाम व्हायचा तोच झाला. टिळकांचे जहाल विचार, संतापी भाषा व प्रतापी कर्तृत्व यांनी सरकार आधीच दचकले होते. या वधांच्या मागे त्यांचीच प्रेरणा असली पाहिजे, असा अंदाज करून सरकारने टिळकांना पकडून त्यांच्यावर खटला भरला. पुढे चाफेकर बंधूही सापडले व सरकारने त्यांना फाशी दिले. परंतु या प्रकरणावरून टिळकांची कीर्ती मध्यान्हीच्या सूर्यासारखी देशभर तळपत राहिली व ते जनतेचे अनभिषिक्त सम्राट झाले.

दि. ६ सप्टेंबर १८९८ या दिवशी टिळक दुसऱ्या बंदिवासातून मुक्त झाले त्यापूर्वी त्यांनी त्यांच्या एका मित्राला एक वचन दिले होते. त्यांच्या या मित्राचे नाव बाबामहाराज पंडित. बाबामहाराज कोल्हापूरचे मोठे जहागीरदार होते. लक्षावधी रुपयांची त्यांची मालमत्ता होती ते त्यावेळी आजारी होते, मृत्यूशय्येवर होते. त्यांच्या पत्नी ताईमहाराज. बाबामहाराजांना मुल नव्हते आणि ताईमहाराज वयाने लहान, शिवाय मालमत्तेच्या व्यवहाराबाबत अज्ञानी. त्यामुळे आपल्या मागे आपल्या मालमत्तेच्या व्यवस्थेसाठी कुणीतरी शहाणा विश्वस्त असावा म्हणून बाबामहाराजांनी टिळ-

कांगा ग्ळ घातली. मृत्युशय्येवरच्या मित्राची इच्छा मोडायला नको म्हणून मनात नसतानाही टिळकांनी बावामहाराजांच्या मालमत्तेचे विश्वस्तपद स्वीकारले थोड्यात्र दिवसात बावामहाराज मरण पावले.

आणि मग वेगळ्याच घटना घडत गेल्या. टिळकांचे विश्वस्त-पद ज्यांना नको होते, अशा कोल्हापूरच्या काही विघ्नसंतोषी लोकांनी ताईमहाराजांचे कान फुंकले, टिळकांच्या चारित्र्यावर शितोडे उडविले व अखेर त्यांना न्यायालयात खेचले. मग टिळकांनी जगन्नाथमहाराजांना दत्तक घेऊन बावामहाराजांच्या मालमत्तेला वारस निर्माण केला, पण त्यामुळे प्रकरण आणखीच चिघळलें. शेवटी दि २४ ऑगस्ट १९०३ रोजी टिळकांना पुण्याच्या कोर्टात १।। वर्ष सक्तमजुरी व १००० रुपये दंड अशी शिक्षा झाली. परंतु टिळकांनी अपील केल्यामुळे व सरकारने योग्य न्याय दिल्यामुळे १९०४ साली या प्रकरणातून ते कायमचे निष्कलंक मुक्त झाले. पुण्याच्या मंडईत त्यांचा टोलेजंग सत्कार झाला. तथापि एवढ्याने भागले नाही. इ. स १९०४ साली या खटल्या-चा निर्णय टिळकांच्या बाजूने लागूनही अनेक उपद्व्यापी मंडळीं-नी हे प्रकरण सारखे शिजत ठेवलें व शेवटी २१ जुलै १९२० रोजी म्हणजे टिळकांच्या मृत्यूपूर्वी फक्त ९ दिवस या प्रकरणातून पूर्णपणें सुटले.

ताईमहाराजांच्या या प्रकारणातून टिळक १९०४ साली थोडे मुक्त झाले खरे परंतु पुढच्याच वर्षी म्हणजे ऑक्टो. १९०५ साली लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी आखली. त्यामुळे सबंध हिन्दुस्थानभर एकच संतापाची लाट उठली. बंगालचे बिपिन चंद्रपाल, पंजाबचे लाला लजपतराय आणि महाराष्ट्राचे लोकमान्य टिळक या तीन देशभक्त महापुरुषांच्या रूपाने सबंध हिन्दुस्थानचे संताप-सामर्थ्य एकवटून त्याचे एक वज्र बनले व त्याने इंग्रजी

साम्राज्यावर घणघाव घालायला सुरुवात केली. लो. टिळक यांचे शौर्य आणि संघटनकौशल्य याप्रसंगी एका वेगळयाच दीप्तीने प्रगट झाले. त्यांनी देशाला स्वराज्याची चतु:सूत्री सांगितली. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ही ती चतु: सूत्री. ही चार सूत्रे म्हणजे स्वातंत्र्यमंदिराच्या चार पायऱ्याच. प्रथम विदेशी वस्तूंचा त्याग करून सर्वत्र स्वदेशी स्वत:च्या देशात तयार झालेल्या-वस्तूंचा वापर करायचा. पण मग विदेशी वस्तूंचे काय करायचे? त्यांच्यावर घालायचा बहिष्कार. बहिष्कार म्हणजे चक्क फेकून देणे, शक्य तर जाळून टाकणे. आणि पुढे काय? पुढे ज्यातून आपली राष्ट्रीय अस्मिता पोसली जाईल, वाढली जाईल, आपल्या राष्ट्राविषयी आपल्या मनामध्ये पराकोटीचा अभिमान जागृत होऊन, असे राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण घ्यायचे. पण हे शिक्षण घेऊन काय होणार ? काय होणार म्हणजे? आपल्या राष्ट्राचे, देशाचे शत्रू आपल्याला कळून येतील व मग आपण सर्वजण एकत्र येऊन त्यांचा नाश करू. तो नाश झाला, की मिळालेच आपल्याला स्वराज्य, मिळालेच आपल्याला स्वातंत्र्य! अशी लो. टिळकांनी सांगितलेली चतु:सूत्री.

लोकांना ती एकदम आवडली, पुरेपूरे पटली. त्यांनी टिळकांचा एकत्र जयघोष केला आणि स्वराज्याचे रणशिंग फुंकले. मग काय जागोजाग विदेशी कपड्यांच्या होळ्या पेटल्या. परकीय इंग्रज अधिकाऱ्यावर बाँब फेकले जाऊ लागले, त्यांच्या वर पिस्तुले झाडली जाऊ लागली, त्यांच्या गाड्या उलथल्या जाऊ लागल्या. देशभर सभापरिषदांना उधाण आले. सर्वत्र स्वदेशीचे ध्वज फडकू लागले. 'वंदे मातरम्, 'वंदे मातरम्' हा एकच एक जयमंत्र लक्ष लक्ष कंठांतून निनादू लागला. लहान नाही, मोठा नाही, म्हातारा नाही, गरीब नाही, श्रीमंत नाही, कुणी कुणीही मागे राहिले नाही. सगळे सगळे रणांगणावर धावले आणि त्यांनी एकाच संतापी

आणि प्राणी अशा आवाजात इंग्रजांना बजावले 'बंगालची फाळणी रद्द करा!' कोट्यावधी भारतीय बांधवांचा हा रुद्रावतार, हे भीषण तांडवनृत्य पाहून सरकार अगदी बावरून घाबरून गेले तथापि तितकेच चवताळूनही गेले! आणि मग सरकारने दिसेल त्याला ठोकायला, तुडवायला, तुरुंगात कोंडायला, अंधारकोठडीत डांबायला, हद्दपार करायला, जन्मठेपीवर धाडायला आणि प्रसंगी फासावर चढवायला सुरूवात केली. अर्थात याचा परिणाम आणखीच विपरीत झाला. लोक जास्तच चिडले. इ. स. १९०७ साली सरकारने लाला लजपतरायांना हद्दपार केले. टिळकांना हे कळताच ते तात्काळ गरजले, 'एक लाला लजपतराय हद्दपार झाला. तर त्याच्या जागी पन्नास लाला लजपतराय निर्माण होतील.

—आणि खरोखरीच तसे घडले देशातील अनेक तरुण लालाजींच्या तेजाने सरकारच्या नरडीचा घोट घ्यायला उभा राहिला. इ. स. १९०८ साली सुरतेला राष्ट्रीय सभेचे जे अधिवेशन भरले. त्यात सरकारला आणि सरकारपुढे अर्ज-विनंत्या करून लोटांगणी जाणाऱ्या मवाळ पक्षाला देशाच्या या वाढलेल्या सामर्थ्याचे प्रखर दर्शन घडले. सुरतेच्या सभास्थानी तर अध्यक्षांपेक्षा लो टिळकांबाच अधिक जयजयकार झाला. काही विघ्नसंतोषी मवाळांनी टिळकांवर खुर्च्या फेकण्याचा व जोडे टाकण्याचा मूर्ख प्रयत्न केला, तेव्हा साक्षात मवाळाग्रणी गोपाळ कृष्ण गोखलेच टिळकांच्या भोवती छातीच्या कोट करून उभे राहिले. टिळकपक्षाचे सामर्थ्य किती वाढले आहे, याची त्यांना पुरेपूर कल्पना आली होती!

पण सरकार अगदीच अविचारी होते. या सगळ्या प्रक्षोभाचे कारण टिळक आहेत, हे त्याने ओळखले होते व एकदा टिळकांना तुरुंगात डांबून टाकले, की सर्व देश शांत होईल अशी सरकारची कल्पना. त्यामुळे दि. १३ जुलै १९०८ या दिवशी सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून खटला भरला. टिळकांनी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दिनांक

या प्रसंगी आपली बाजू अत्यंत भक्कमपणे आणि उत्तम भाषेत मांडली. ओळीने सात दिवस ते आपले म्हणणे मांडत होते; पण सरकारने त्यांना तुरुंगात कोंडून ठेवण्याचाच विडा उचलला होता. त्यामुळे नऊपैकी सात ज्यूरींनी त्यांना दोषी ठरविले.

टिळकांचे वय त्यावेळी पन्नाशीच्या पुढे होते. एका अर्थी ते वृद्ध झाले होते, थकले होते. त्या दिवशी पावसाळी हवा होती. अंधारी रात्र. न्यायालयात मिणमिणत्या गॅसबत्त्यांचा प्रकाश. खटला ऐकायला जमलेल्या लोकांच्या छातीत धडधड होत होती. श्वास रोखले गेले होते. टिळक मात्र धीरगंभीरपणे उभे होते. अखेर न्यायमूर्ती दावर यांनी त्यांना विचारले, 'तुम्हाला काय सांगायचे आहे का ?' तेव्हा कडकडत्या स्तंभातून प्रकटणाऱ्या नरसिंहाप्रमाणे गर्जून टिळक म्हणाले,

'ज्यूरीने मला दोषी ठरविले, तर खुशाल ठरवो. पण मी निश्चयपूर्वक सांगतो, की मी दोषी नाही. लौकिक गोष्टींचे नियंत्रण करणारी अशी एक शक्ती आहे, की ती न्यायपीठाहून वरिष्ठ आहे. कदाचित ईश्वराचीच अशी इच्छा असेल की मला शिक्षा व्हावी आणि ती भोगल्यानेच मी अंगीकारलेल्या कार्याला ऊर्जितावस्था यावी.'

यानंतर न्यायमूर्तींनी टिळकांना सहा वर्षे काळेपाणी व एक हजार रुपये दंड अशी भीषण शिक्षा सांगितली. ती शिक्षा ऐकून तिथे जमलेल्या सहस्रावधी नागरिकांच्या जीवाचे पाणी पाणी झाले. पण टिळक थोडेसुद्धा डगमगले नाहीत. आपली भीषण शिक्षा भोगण्यासाठी ते अत्यंत धीरोदात्तपणे व हसतमुखाने आरक्षकांच्या गाडीत जाऊन बसले. त्याच रात्री सरकारने त्यांना अहमदाबादला पाठवून दिले. तिथल्या तुरुंगवासाच्या पहिल्या दहा दिवसांतच टिळकांचे वजन दहा पौंडांनी कमी झाले. अहमदाबादला दोन महिने काढल्यावर सरकारने टिळकांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या

तुरुंगात रवाना केले.

टिळकांच्या शिक्षेमुळे देशभर हरताळ पडला. गिरण्या बंद झाल्या. दंगे झाले. संप झाले. लोकांनी उपवास आरंभले. कुणी चांगले–चुंगले खायचे सोडले. कुणी मंगलकार्य रहीत केली. सण –उत्सव करायचे बंद केले. सगळ्या देशाला एकप्रकारची प्रेतकळा आली.

तुरुंगातही टिळक स्वस्थ वसले नाहीत. तिथे त्यांनी अनेक पुस्तके वाचली, खूप ग्रंथ अभ्यासले आणि त्यानंतर भगवद्गीतेचे रहस्य सांगणारा 'गीतारहस्य' नावाचा ग्रंथ लिहून काढला. एवढेच करून ते थांबले नाहीत, तर जर्मन, फ्रेंच, पाली या भाषांचाही त्यांनी तिथे अभ्यास केला.

टिळक तुरुंगात असतानाच त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई पुण्यात मरण पावल्या ती वार्ता ऐकून स्थितप्रज्ञ टिळकही क्षणमात्र सुन्न झाले. आपल्या घरी पाठविलेल्या पत्रात ते लिहितात–"तुमची तार पोचली. मनाला फार मोठा धक्का बसला. संकटे आली तरी ती मी शांतपणाने सोशीत असतो हे खरे. पण खरेच सांगतो, की या वातमीने मी अगदी हादरून गेलो. आपण हिंदू लोक. तेव्हा नवऱ्याच्या आधी बायको गेली हे व्हावे तसेच झाले, असेच कोणीही म्हणणार. पण तिच्या मरणकाळी मी जवळ नाही; इतकेच नव्हे, तर बंदिवासात असावे याचेच फार दुःख वाटते. पण ते होणारच होते भवितव्यतेला कोण काय करणार ?'

दि. ८ जून १९१४ या दिवशी टिळकांना सरकारने मंडालेहून मुक्त केले व दि. १६ जून रोजी त्यांच्या राहत्याघरासमोर आणून सोडले. ती मध्यरात्र होती. टिळकांच्या वाड्याचे दरवाजे बंद होते. तुरुंगवासाने कृश झालेले, दमलेले आणि साठीला टेकत आलेले म्हातारे टिळक दारासमोर उभे पाहून, दारावरच्या भय्याने त्यांना ओळले नाही. तो त्यांना आत घेईना. टिळकांनी धोंडोपंत विद्वां-

सांना बोलावणे पाठविले. ते आल्यावर आनंदाश्रुंनी न्हालेल्या नेत्रांनी आपल्या मामांना आत घेतले. दुसऱ्याच दिवशी ही आनंद-वार्ता साऱ्या शहरभर आणि पाठोपाठ देशभर वायुवेगाने पसरली. मग काय ? सर्व देशभर आनंदोत्सवाला भरतीच आली. लोकांनी दारापुढे सडा-रांगोळ्या केल्या, घरावर गुड्या तोरणे उभारली, सत्यनारायण केले, व्रतांची उद्यापने व उपोषणांची पारणी केली. जागोजाग टिळकांना पानसुपाऱ्या, हारतुरे, सत्कार-सोहळे मिळू लागले. सर्वत्र एकच गाणे निनादू लागले--'सोनियाचा दिवस आजि अमृते पाहिला !' कारण त्या दिवशी पुन्हा एकदा–

वनवासाला गेलेले प्रभू रामचंद्र स्वगृही परतले होते.

–कालियाच्या काळमिठीत अडकलेले गोपाळकृष्ण गोकुळात परत आले होते.

–आग्ऱ्याच्या तुरुंगातून शिवाजी महाराज मुक्त झाले होते.

"कोणत्याही फळाची आशा-अपेक्षा न धरता सतत कर्म करीत राहा" हा गीतेचा आदेश, भगवान् श्रीकृष्णांचा संदेश टिळकांच्या रोमरोमात भिनला होता. स्वस्थ बसणे हे त्यांच्या रक्तातच नव्हते. त्यांनी पुनश्च आपल्या उद्योगांना आरंभ केला. सभा-संम्मेलने भाषणे-संभाषणे, अग्रलेख-जाहिरनामे सुरू झाले. स्वराज्यसंघ स्थापन झाला. त्याच्या प्रचारार्थ टिळकांनी देशभर दौरे केले. जागोजाग त्यांचे सत्कार झाले. मिरवणुका झाल्या. मानपत्रे मिळाली. थैल्या समर्पण झाल्या. विदर्भातल्या दौऱ्यात त्यांनी मुळी स्वराज्याचा मंत्रच सांगून टाकला. ते म्हणाले. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच !'

खरोखरीच ही आपली प्रतिज्ञा पुरी करण्यासाठी, स्वराज्याचा आपला हक्क मिळविण्यासाठी त्यांनी सर्व साधनांचा प्रचार केला. आचार केला. शेवटी कौरवांच्या दरबारात शिष्टाई करायला गेलेल्या श्रीकृष्णासारखे ते विलायतेलाही गेले. इग्रंज बादशहांच्या

दरबारात आपली मागणी खणखणीत शद्बात मांडली. पण पाषाणाची खोळ पांघरलेल्या गोऱ्या लोकांचे ते सरकार! टिळकांची मागणी तिथे मान्य झाली नाही. नवा लढा, नवे युद्ध पुकारण्यासाठी ते स्वदेशी परतले.

—पण आता गात्रे थकली होती. वय साठीपार झुकले होते. शरीर विश्रांती मागत होते. वारंवार येणाऱ्या बारीक तापामुळे टिळकांची प्रकृती क्षीण होत होती. अशा स्थितीतही ते काम करीतच होते. ताईमहाराज प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी टिळक १२ जून १९२० रोजी मुंबईला गेले. तिथल्या न्यायालयाने टिळकांचा विजय झाल्याचे घोषित केले, आणि ते विजयवृत्त ऐकून समाधानाने त्यांनी अंथरुणाला पाठ लावली. त्या दिवसापासून त्यांचा ताप वाढला. प्रतिदिवशी तो वाढतच गेला आणि मग श्रांत —क्लांत झालेले टिळक ३१ जुलै ११२० च्या मध्यरात्री कायमचे निद्रिस्त झाले. मरण पावले!

त्या रात्री एकसारखा पाऊस झिमझिमत होता. लक्षावधी देशबांधवांच्या डोळ्यांना अक्षरशः धारा लागल्या होत्या. दुःखाचे आभाळ कोसळलेच होते. स्वराज्यमंत्रकर्ते लोकमान्य टिळक त्या दिवशी अंतर्धान पावले होते.

म. ग्रं. सं. कार्ये, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ...३८८... दिनांक .......
विषय ...बा.क.... क्र. ........